**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत संरक्षण अधिकारी /कर्मचारी यांची पदे शासनामार्फत कंत्राटीपध्दतीने नेमण्यास मंजुरी देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
शासन निर्णय क्रमांक: संअनि-२००७/ प्र.क्र. २२६ (भाग-२)/ का-२
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक : १४ डिसेंबर, २०१०.**

**पहा :-**१) शासन निर्णय. संकीर्ण-२००६/प्रक्र.२९५/का.२, दि.२१.१२.२००६.
२) शासन निर्णय. संकीर्ण-२००६/प्रक्र.२९५/का.२, दि.२२.५.२००७.
३) शासन निर्णय. संकीर्ण-२००७/प्रक्र.३०६/का.२, दि.२६.१०.२००७.
४) शासन निर्णय. संकीर्ण-२००६/प्रक्र.२९५/का.२, दि.३०.१०.२००७.
५) शासन निर्णय. मसके-२००७/प्रक्र. २३६/का.२, दि.१३.२.२००८.
६) शासन अधिसूचना, दि.४.१२.२००९.
७) शासन निर्णय. संकीर्ण-२००७/प्रक्र. ३०६/का.२, दि.२७.२.२००९.
८) शासन निर्णय. संअनि-२००७/प्रक्र. २२६/का.२, दि.८.६.२०१०.

**प्रस्तावना :-** केंद्र शासनाचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम, २००६ हा जम्मू काश्मिर राज्य वगळता संपूर्ण देशात दि.२६.१०.२००६ रोजी अंमलात आलेला आहे. सदर कायद्यांतर्गत पिडीत महिलांना न्याय मिळण्यासाठी त्यांच्या केसेस न्यायालयात सादर होऊन सुनावणीच्यावेळी संरक्षण अधिकारी न्यायालयात हजर असणे गरजेचे असते. तसेच न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी होते कि नाही याची खात्री करणे, पिडीत महिलेस आवश्यक माहिती देऊन मार्गदर्शन करणे ही कामे सांभाळण्यासाठी सदर कायद्यातील कलम ८ नुसार स्वतंत्र संरक्षण अधिकारी पदअस्तित्वात असणे आवश्यक आहे. सर्व स्तरावर एकाच वेळी नव्याने पदे निर्माण करणे शक्य होऊ शकणार नाही ही बाब लक्षात घेऊन टप्या-टप्याने कंत्राटी पध्दतीने एकत्रित निश्चित मानधनावर संरक्षण अधिकाऱ्याची व कर्मचाऱ्याची पदे निर्माण करुन, संरक्षण अधिकारी नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत पहिल्या टप्यात ३५ जिल्हयातील कार्यालयासाठी संरक्षण अधिकारी व कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर नेमण्यास व त्यासाठी कंत्राटी पदाचा आकृतीबंध व निश्चित मानधन पुढीलप्रमाणे ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. मुंबई शहर व मुंबई उपनगर या २ जिल्हया व्यतिरिक्त उर्वरित ३३ जिल्हयातील कार्यालयासाठी कंत्राटी पदाचा कर्मचारी आकृतीबंध व निश्चित मानधन खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | पदाचे नाव | निश्चित मानधन रु | प्रस्तावित पदे | एकुण मासिक खर्च (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| १. | संरक्षण अधिकारी | १२,०००/- | ३३ | ३,९६,०००/- |
| २. | सहायक संरक्षण अधिकारी | ८,०००/- | ३३ | २,६४,०००/- |
| ३. | बहुउद्देशिय कर्मचारी(डाटा एन्ट्री ऑपरेटर) | ६,०००/- | ३३ | १,९८,०००/- |
| | एकुण | २६,०००/- | ९९ | ८,५८,०००/- |

२. मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयातील लोकसंख्या, विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन या जिल्हयांसाठी प्रत्येकी दोन याप्रमाणे ४ कार्यालये सुरु करण्यात यावीत. तसेच या शहरातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन या चार कार्यालयासाठी कंत्राटी पदाचा आकृतीबंध व निश्चित मानधन खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदाचे नाव | निश्चित मानधन रु | प्रस्तावित पदे | एकुण मासिक खर्च (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| १. | संरक्षण अधिकारी | १५,०००/- | ४ | ६०,०००/- |
| २. | सहायक संरक्षण अधिकारी | १०,०००/- | ४ | ४०,०००/- |
| ३. | बहुउद्देशिय कर्मचारी(डाटा एन्ट्री ऑपरेटर) | ८,०००/- | ४ | ३२,०००/- |
| | एकुण | ३३,०००/- | १२ | १,३२,०००/- |

३. **वार्षिक वाढ :-** संरक्षण अधिकारी व कर्मचारी यांच्या मानधनात दरवर्षी १०% एवढी वाढ करण्यात येईल.

४. **कार्यालयीन आवर्ती खर्च :-** पिडीत महिलेच्या तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी गृहभेटी देणे, बैठकांना हजर राहणे, प्रतिपक्षास नोटीस बजावणे इत्यादी बाबीसाठी प्रवास करावा लागणार आहे. तसेच या कार्यालयांना महिलांच्या तक्रारी, कौटुंबिक घटना अहवाल, न्यायालयीन आदेशांच्या प्रती, पोलीस स्टेशन व सेवा पुरविणारे यांना पुरवाव्या लागणार आहेत. तक्रारदार महिलांसाठी नमुना फार्मस उपलब्ध करुन देणे, दररोजचा पत्र व्यवहार यासाठी प्रवासभत्ता, स्टेशनरी व दुरध्वनी यांची आवश्यकत्ता लागणार आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यालयास प्रवास भत्ता, स्टेशनरी व दुरध्वनीसाठी दरमहा रु.२,५००/- इतका निधी देण्यात येईल.

५. **अनावर्ती खर्च :-** प्रत्येक कार्यालयासाठी फर्निचर, संगणक, प्रिंटर इत्यादीकरिता प्रत्येकी सुरवातीला अनावर्ती खर्चासाठी रु.३३९८१/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

६. **कार्यालयाची स्थापना:-** संरक्षण अधिकारी कार्यालय हे सद्यःस्थितीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयातच सुरु करण्यात यावे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात जागा

उपलब्ध होत नसल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात संरक्षण अधिकाऱ्याचे कार्यालय सुरु करण्यात यावे.

७. संरक्षण अधिकारी कार्यालयाची स्थापना करण्यासाठी व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम, २००६ अंतर्गत संरक्षण अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणुका, संरक्षण अधिकाऱ्यांना त्याचे काम पार पाडणे सोयीचे व्हावे या दृष्टीने खालीलप्रमाणे विहित केलेल्या पध्दतीच्या अनुषंगाने अंमलबजावणी व कार्यवाही करण्यात यावी:-

(७.१) <u>**कंत्राटी पदे भरती संदर्भात विहित प्राधिकारी:-**</u> संरक्षण अधिकारी, सहायक संरक्षण अधिकारी व बहुउद्देशिय कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) ही पदे कंत्राटी पध्दती भरावयाची असल्याने त्यांची नियुक्ती आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचे समन्वयाने करण्यात यावी.

(७.२) <u>**संरक्षण अधिकारी कार्यालयाचे संनियंत्रणाची जबाबदारी :-**</u> सर्व जिल्हयातील संरक्षण अधिकाऱ्याच्या कार्यालयांचे नियंत्रण करण्यासाठी व अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांची राहील. तसेच जिल्हा स्तरावर सदर कायद्याची अंमलबजावणी करणे व संरक्षण अधिकारी कार्यालपाच्या नियंत्रणाची जबाबदारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची राहील.

(७.३) <u>**संरक्षण अधिकाऱ्याकडे इतर कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी :-**</u> हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ व देवदासी प्रतिबंधक अधिनियम, २००५ यांची अंमलबजावणी करण्याकरिता सदर कायद्याखालील प्रतिबंधक अधिकारी म्हणून संरक्षण अधिकाऱ्यांना घोषित करण्यात येत आहे.

<u>**८. संरक्षण अधिकारी, सहायक संरक्षण अधिकारी व बहुउद्देशिय कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) या पदांच्या निवडीचे निकष व त्याची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**</u> संरक्षण अधिकारी, सहायक संरक्षण अधिकारी व बहुउद्देशिय कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) या पदाचे निवडीचे निकष व कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राहतील :-

(८.१) <u>**संरक्षण अधिकारी पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**</u>

(अ) संरक्षण अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार खालील कर्तव्ये पार पाडावी लागणार आहेत दंडाधिका-यांना मदत करणे, कौटुंबिक छळाच्या घटनांचा अहवाल दंडाधिका-यांना देणे, व त्याच्या प्रति संबंधित पोलिस स्टेशनला देणें व सेवा वितरक यांना पाठविणे. महिलांच्या वतीने दंडाधिका-यांकडे मदतीसाठी किंवा संरक्षणासाठी अर्ज करणे, महिलेला मोफत वकिली सल्ला मिळवून देण्यावाबत कारवाई करणे, त्या क्षेत्रात सर्व सेवावितरक / आधारगृह व वैदयकिय सेवा देणा-या केंद्राची यादी ठेवणे. आवश्यक असल्यास महिलांची वैदयकिय तपासणी करुन घेणे. तपासणी अहवालाची प्रत पोलिस स्टेशन व दंडाधिकारी यांना पाठविणे. जर न्यायालयाने तिला आर्थिक मदतीचे आदेश काढल्यास त्याची अंमलबजावणी करुन घेणे इत्यादि कामे संरक्षण अधिकारी दंडाधिका-याच्या नियंत्रणाखाली काम करेल.

(ब) संरक्षण अधिकारी या कंत्राटी पदावर उमेदवाराची निवड करताना खालील निकष राहतील.

१) किमान समाज कार्यातील पदव्यूत्तर पदवी (MSW) असावी.

२) समाज कार्यातील पदव्यूत्तर पदवी बरोबर विधी पदवी असल्यास प्राधान्य देण्यात यावे.

३) कौटुंबिक हिंसाचार, हुंडा प्रथा, बाल विवाह, देवदासी प्रथा निर्मूलन, महिलांसाठी समुपदेशन यामध्ये कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात यावे.

४) समाज कार्यातील किमान ३ वर्षाचा अनुभव असावा.

५) वयोमर्यादा किमान २५ वर्षे व कमाल ४० वर्ष असावी.

(८.२) <u>सहाय्यक संरक्षण अधिकारी पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-</u>

(अ) सहायक संरक्षण अधिकारी या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राहतील :-

१) संरक्षण अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या केसेसमध्ये संबधित पिडित महिलेकडुन कागदपत्रांची पुतता करुन घेण्यासाठी पाठ पुरावा करील.

२) कार्यालयीन पत्रव्यवहाराचा संरक्षण अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार निपटारा करील.

३) कार्यालयाची लेखा विषयक कामे पार पाडील.

४) संरक्षण अधिकाऱ्यांच्या सुचनेप्रमाणे त्याला कामात मदत करणे व त्यांचे गैरहजेरीत संरक्षण अधिकाऱ्यांचे नियमित (दैनंदीन) काम पाहणे .

५) सहाय्यक संरक्षण अधिकाऱ्यांनी या कायदयांतर्गत न्यायालयात दाखल केलेल्या केसेसचे रेकॉर्ड ठेवील. केस नोंदणी रजिस्टरवर केसच्या प्रगतीबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाबाबत नोंदी घेईल.

**(ब) सहाय्यक संरक्षण अधिकारी या कंत्राटी पदावर उमेदवाराची निवड करताना खालील निकष राहतील.**

१) किमान विधी पदवीधर असावा.

२) समाज कार्यातील किमान १ वर्षाचा अनुभव असावा.

३) वयोमर्यादा किमान २५ वर्ष व कमाल ४० वर्ष असावी.

**(८.३) <u>बहुउद्देशिय कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्याः-</u>**

**(अ) बहुउद्देशिय कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतीलः-**

१) संपुर्ण जिल्हयाची या कायदयातर्गत तसेच बाल विवाह प्रतिबंध, हुंडा निर्मूलन आणि देवदासी प्रथा निर्मूलनांतर्गत झालेल्या व होत असलेल्या कामाची सांख्यिकी माहिती अदययावत ठेवणे.

२) आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी कार्यवाही करणे.

३) कार्यालयाचे टंकलेखन व संगणकावरील काम करणे.

४) कार्यालयातील आवक, जावक रजिस्टर नोदी घेवुन त्या अदययावत ठेवणे.

५) संरक्षण अधिकाऱ्यांने / सहाय्यक संरक्षण अधिकाऱ्याने, कार्यालयाच्या गरजेनुसार त्यांच्या आदेशाने त्यांनी सोपविलेली इतर कार्यालयीन कामे पार पाडणे.

**(ब) बहुउद्देशिय कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) यांच्या कामाचे स्वरूप पाहता या पदावर निवड करताना खालील निकष राहतील :-**

१) किमान शैक्षणिक अर्हता १२ वी पास असावी.

२) संगणकाचे ज्ञान आवश्यक असावे (MS-CIT परिक्षा उत्तिर्ण).

३) पदवीधर व कार्यालयीन कामकाजाचा अनुभवी व्यक्तीस प्राधान्य देण्यात यावे.

४) वयोमर्यादा किमान २० वर्ष व कमाल ३० वर्ष असावी.

९. **खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्षः-** यासाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून खर्च करण्यात यावा व त्याच लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

मागणी क्र. एक्स - ०१,

- सामाजिक सुरक्षा व कल्याण, २२३५ -

०२- समाजकल्याण,

१० - कंत्राटी सेवा,

११ - देशांतर्गत प्रवास खर्च,

१३-कार्यालयीन खर्च,

१०. **नियंत्रण अधिकारी व आहरण व संनियंत्रण अधिकारीः-** सदर खर्चासाठी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संनियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

११. **अनुदान पध्दती :-** संबधीत जिल्हयाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अनुदानाचे वितरण करण्यात येईल. पुढील वर्षाचे अनुदान वितरीत करताना मागील वर्षाच्या अनुदानाचे मुल्यनिर्धारण करुनच चालू वर्षीचे अनुदान वितरीत करावयाचे आहे. तथापी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामार्फतच कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेल्या संरक्षण अधिकारी व त्यांच्या कार्यालयासाठी आवश्यक निधीची मागणी केल्यावर, त्याप्रमाणे मागिल वितरीत केलेल्या खर्चाची खात्री करुन, मागणीप्रमाणे आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

१२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७१६/१०/व्यय-६, दि.३.१२.२०१० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. तसेच सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१०१२१४१६३८२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा/-

(श. पा. वारे)

शासनाचे उप सचिव

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई.

पोलीस महासंचालक, पोलिस मुख्यालय, मुंबई.

समन्वयक, महिला व बालकांचे विशेष कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई.८८

सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

सचिव, महाराष्ट्र राज्य वाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.

व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई.

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरिक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग (गुन्हे), संगमब्रिज, शिवाजीनगर, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५.

महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.

सर्व निबंधक, उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर/औरंगाबाद,

सर्व जिल्हा न्यायाधिश, जिल्हा न्यायालय,

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,

सर्व उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

राज्य समन्वयक (PPMU), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

अधिक्षक, राज्य गृहे (सर्व) (आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत)

सर्व समुपदेशन केंद्र /सेवा पुरविणारे-(Service Provider), इ. (महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील) (आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत)

निवड नस्ती, का-२.

*****